25 जानेवारी

सा. बीड गदर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक ज्ञानेश्वर लंगे मो 9763521855

बीड- महाराष्ट्र | साप्ताहिक | वर्षे 1 ले | अंक 10 वा | शनिवार, दि. 25 जानेवारी 2025 | टीसी- एमएएचएमआर/2023/52253 | पाने 4 | किमत 2 रु |

BEED - MAHARASHTRA VICKELY | VOL 1 | ISSUE 9 | Saturday, 25 January 2025 | TC- MAHMAR/2023/52253 | PAGE 4 | Rs 2 रु |

# लाखो मराठ्यांची अंतरवलीकडे कुच

## जरांगे पाटलांच्या सामुहिक उपोषणाची तयारी पुर्ण

## मी येणार आपणही या सोशल मीडियावर निरोप



अशोक निपटे : आंतरवाली प्रतिनिधी

मराठ्यांचा ढाण्या वाघ, मराठ्यांचे काळीज, मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील पुन्हा मैदानात उतरणार आहेत. मराठ्यांची न्याय मागणी पदरात पाडून घेतल्याशिवाय माघार घेणार नाही अशी ठाम भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. उद्यापासून म्हणजेच ( २५ जानेवारी ) मनोज जरांगे पाटील अंतरवली सराटित उपोषणाला बसणार आहेत. महाराष्ट्रातील कोट्यावधी मराठ्यांचे लक्ष आंतरवडीकडे लागले आहे.

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी महाराष्ट्रातील कोट्यावधी मराठ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपला प्राण पणाला लावला आहे. मागील अनेक वर्षापासून मराठा समाजासाठी त्यांचा लढा सुरू आहे. हा लढा आता अंतिम टप्प्यात आलेला आहे. गेल्या वर्षीपासून त्यांनी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले होते. सरकारने त्यांना आश्वासनही दिले होते. मात्र आश्वासन सरकारने पाळले नाही. त्याउलट मनोज जरांगे पाटील यांच आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न देखील झाला. लाठ्या, काठ्या, बंदुकीच्या गोळ्या झाडून अनेक लोकांना जखमी करण्यात आलं होत. एवढं करूनही सरकारने मराठ्यांच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावला नाही. म्हणून मनोज जरांगे पाटील यांना पुन्हा पुन्हा उपोषणास बसण्याची वेळ येत आहे.

सरकारने जरांगे पाटलांच्या मागणीचा विचार करून आरक्षण देण्याचे जाहीर केले होते. मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्यास सुरू देखील झाली होती. मात्र महाराष्ट्रातील अनेक मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. सरसकट आरक्षणाची मागणी जरांगे पाटील यांनी लावून धरली आहे. सगेसोयरे लागू करा. हैदराबाद गॅजेट लागू करा. या मागणीसाठी पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील आंदोलनात उतरणार आहेत. २५ जानेवारीपासून उपोषण करण्याचा इशारा त्यांनी या अगोदरच सरकारला दिला होता. या इशाऱ्यानुसार मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसणार आहेत. जरांगे पाटील यांची प्रकृती नाजूक झाल्यामुळे त्यांनी उपोषण करू नये अशी भूमिका महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या बांधवांनी घेतली. मात्र जरांगे पाटील ऐकायला तयार नाहीत. माझा स्वतःचा जीव गेला तरी हरकत नाही. मराठ्यांच्या लेकरांसाठी मी माघार घेणार नाही. अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. जोपर्यंत मराठ्यांचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत मी माघार घेणार नाही असा ठाम निश्चय मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

### काही बांधव अंतरवालीत दाखल

मनोज जरांगे पाटील 25 जानेवारीपासून मराठा समजाच्या न्याय्य मागणीसाठी उपोषणास बसणार आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मराठा समाजाने आंतरवालीचा रस्ता धरला आहे. अनेक समाज बांधवांनी आपापली कामे बाजूला सोडून अंतरवालीकडे जाण्याचा निर्णय घेतला आहे. मराठवाड्याच्या बाहेरील जिल्ह्यातील काही मराठा बांधव आंतरवालीकडे दाखलही झाले आहेत. मराठवाड्यातील मराठा बांधव यांनी 24 तारखेला संध्याकाळी आंतरवाली मध्ये दाखल होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आंतरवाली येथे मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### सरसगट मराठ्यांची उपस्थीती

संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील आपल्या समाजासाठी मराठा समाजासाठी जो लढा त्यांनी उभा केलाय त्यांच्या पाठीशी सर्व मराठा समाजातील लहान,थोर,माता भगिनी व बंधू मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार असल्याचे बोलले जात आहे.





### जरांगे पाटलांनी उपोषण करू नये

मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती अत्यंत नाजूक झालेली आहे. त्यांनी दोन-तीन दिवस उपोषण केले तर त्यांची प्रकृती ढासळते. त्याचा परिणाम जरांगे पाटील यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे जरांगे पाटील यांनी उपोषणाचा निर्णय न घेता इतर मार्गाने आंदोलन करण्याची मागणी महाराष्ट्रातील तमाम मराठा बंधू भगिनींनी मागणी केली आहे.

### सरकार उपोषणाची वेळ ?

मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती आता ठीक नाही अनेक वेळा उपोषण करुन आणि प्रवास करुन त्यांची तब्येत खूप ढासळली आहे तरीही ते 25 तारखेला उपोषणाला बसणार आहेत त्यांना उपोषण करण्याची वेळ सरकार का आणत आहे. दिलेला शब्द सरकार का पाळत नाहीं असा सवाल उपस्थित होत आहे.



### सोशल मीडियावर पोस्ट

मनोज जरांगे पाटील हे 25 जानेवारीपासून उपोषणास बसणार आहेत. या उपोषणाला आपण देखील पाठिंबा दिला पाहिजे या उद्देशाने सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर पोस्ट व्हायरल होत आहेत. मी येणार आपणही या अशा पद्धतीचे निरोप सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

### आता समाजाचा अंत बघू नये

अंतरवाली सराटी या ठिकाणी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना सातव्यांदा सामूहिक अमर उपोषण करावा लागत आहे हे खूप दुर्दैवाची गोष्ट आहे 26 जानेवारी 2024 वाशी मुंबई येथे मुख्यमंत्री साहेबांनी दिलेला शब्द पाळला नाही सगे सोयरे, हैदराबाद गॅझेट, बॉम्बे गॅजेट,सातारा गॅजेट हे सर्व लागू करणार असे मुख्यमंत्री साहेबांनी सांगितले होते परंतु आज वर्ष होऊन गेले तरी यातली एकही गोष्ट सरकारने पूर्ण केली नाही. त्यामुळे आता परत मनोज जरांगे पाटला सारख्या व्यक्तीला मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसावं लागत आहे. त्यांच्या जीवाला काही धोका झालास यास सर्वस्वी सरकार जबाबदार राहील त्यामुळे मराठा समाजाचा अंत बघू नये असा इशारा समाजांच्या वतीने दिला गेला आहे.

### मराठा योद्धा जरांगे पाटील यांनी महाराष्ट्रातील सहा कोटी

मराठ्यांच्या हक्काचा आरक्षणाचा प्रश्न शासन दरबारी मांडला आहे हा प्रश्न बऱ्याच अंशी मार्गे देखील लागला आहे मात्र शासनाने दिलेले सगळ्या सोयऱ्याचा आश्वासन अद्याप लागू करण्यात आलेलं नाही हैदराबाद गॅजेट लागू केलं नाही . राज्यातील मराठ्यांच्या हक्काचं आरक्षणाचा प्रश्न शासन जाणीवपूर्वक भिजत ठेवत आहे म्हणून जरांगे पाटील यांनी शासनावर वेळोवेळी विश्वास दाखवला आणि या अगोदर केलेले पाच वेळेचे उपोषण सोडले मात्र सरकारने वेळोवेळी दिशाभूल करुन फसवणूक केली आहे त्यामुळे संतप्त झालेले मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा उद्या 25जानेवारी पासून सामुहिक उपोषण करणार आहेत. त्यांची तयारी पुर्ण झाली असुन उपोषणासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून मराठा समाज बांधव लाखोच्या संख्येने अंतरवलीत दाखल होणार आहेत. त्यांच्या त्यांची कोणत्याही प्रकारची गैर सोय होणार नाहीं याची काळजी आम्ही ग्रामस्थ घेणार आहोत.

-अशोक तारक, मराठासेवक अंतरवली

### आंतरवालीतिल तयारी पूर्ण...

26 जानेवारीला सगेसोयरेची अधिसूचना काढून 1 वर्ष पूर्ण होतंय, परंतु याची अंमलबजावणी करायला एक वर्ष का लागले?. आमच्या हक्काचं आरक्षण ओबीसीतूनच द्यावे तुम्ही मुलींना मोफत शिक्षण केले, कालच माझ्याकडे एक अर्ज आला. पुण्यातील वाघोलीतल्या कॉलेजनं एका मुलीला पत्र लिहून अद्याप मुलींना मोफत शिक्षणाची अंमलबजावणी झाली नाही असं कळवले. कोल्हापूरच्या भाजप जिल्हाध्यक्षानेही पत्र देऊन मुलीचा प्रवेश रद्द करु, नये अशी कॉलेजकडे मागणी केली आहे. हा इतका बोगस प्रकार आहे. आम्ही 10 टक्के आरक्षण मागितले नाही, ओबीसीतलं आरक्षण मागितले. कुणबी नोंदी शोधायचं काम बंद झाले, मराठ्यांचा छळ सरकार का करतंय, आमच्या हक्काचं आरक्षण दिले जात नाही, असा निशाणा मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर साधला.